**नियमित दिवाणी दावा क्र. ४५४/२०२२**

**आण्णासो ताठे वि. महादेव ताठे व इतर**
**CNR No.MHSO07-000585-2022**

## <u>निशाणी क्र. ३१ वरील आदेश</u>

वादीने प्रस्तुतचा अर्ज न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करुन खालीलप्रमाणे मौजे सस्ते, ता. पंढरपूर येथील गट क्र.५४० या जमिनीत प्रत्यक्ष भेट देऊन दिसते परिस्थितीचा नकाशासह अहवाल न्यायालयात हजर करण्यासाठी आदेश करावेत म्हणून सदरचा अर्ज दाखल केला आहे.

२. वादी असे कथन करतो की, वादी प्रतिवादींमध्ये सन २००४ साली वाटप झाले आहे. दावा कलम १अ मध्ये नमूद मिळकत ही वादी यांचे मालकीहक्कात व ताबेकब्जा वहिवाटीत आहे. दावा कलम १ब मधील मिळकत ही प्रतिवादी क्र.१ यांच्या मालकीहक्कात व कब्जेवहिवाटीत आहे. दावा कलम १अ या मिळकतीच्या पूर्व बाजूस प्रतिवादी क्र.२ यांची मिळकत आहे व पश्चिमेस प्रतिवादी क्र.१ यांची दावा कलम १ब मधील मिळकत आहे. ही परिस्थिती अभिलेखावर आणण्याकरिता वादीने न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक होण्याची विनंती केली.

३. पुढे वादी असे कथन करतो की, दावा कलम १अ मधील मिळकतीमध्ये पत्राशेड आहे व सदर मिळकतीमध्ये जमिनीची धूप होऊ नये म्हणून वादीने पश्चिमेस बांध घातलेला आहे. सदरचा बांध वादी व प्रतिवादी यांच्या मिळकतीच्या मध्ये असून दक्षिणोत्तर चालीचा बांध व त्यावर वादीच्या मालकीची शेव–याची झाडे आहेत. सदरची झाडे वादी प्रतिवादी यांच्यामधील मिळकतीची हद्द कायम करणारे आहेत. वादीने दावा कलम १अ मधील मिळकतीमध्ये डाळिंब या पिकाची लागवड केली आहे. सदरची बाब अभिलेखावर आणण्याकरिता न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक व्हावी अशी विनंती केली आहे.

४.     वादी पुढे असे कथन करतो की, दावा कलम १अ मधील मिळकत बागायत करण्यासाठी गट क्र.९४ मधील शेततळ्यामधून पाईपलाईन करुन सदरचे पाणी वादीने दावा कलम १अ मधील मिळकतीमध्ये आणलेली आहे. ही वस्तुस्थिती अभिलेखावर आणण्याकरिता न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक व्हावी अशी विनंती केली आहे.

५.     सदर अर्जास प्रतिवादी क्र.१ यांनी म्हणणे दाखल केले व हरकत नोंदवली. प्रतिवादी क्र.१ असे कथन करतो की, दावा कलम १अ मध्ये नमूद केलेली मिळकत ही प्रतिवादी क्र.१ यांच्या मालकीची असताना वादीने सदरची मिळकत त्याच्या मालकीची आहे असा मजकूर नमूद केलेला आहे. दावा कलम १अ मधील मिळकत प्रतिवादी क्र.१ यांच्या मालकीची असलेबाबत या प्रतिवादीने दिनांक १७/०४/२०२३ रोजी सदर बाबतीतील कागदपत्रे अभिलेखावर दाखल केली आहेत. तसेच पत्राशेड, बांध, शेवरीची झाडे, डाळिंबाची बाग या सर्व बाबी प्रतिवादी यांच्या मालकीच्या आहेत. वादीने पुरावा गोळा करण्याच्या उद्देशाने सदरचा अर्ज दाखल केलेला असल्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

६.     दावा, कैफियत यांचे अवलोकन केले. वादीने सदरचा अर्ज दावा मिळकतीची वस्तुस्थिती अभिलेखावर आणण्याकरिता दाखल केले आहे. वादीने अर्जात असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.१ ने म्हणणे दाखल करुन वादीने दर्शविलेली वस्तुस्थिती नाकारली आहे. त्यामुळे दावा मिळकतीची वस्तुस्थिती अभिलेखावर आणण्याकरिता न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक होणे गरजेचे आहे.

७.     वादीने दावा कलम १ अ मधील मिळकत ही त्यांच्या मालकीची आहे व १ब मधील मिळकत ही प्रतिवादी क्र.१ यांच्या मालकीची आहे, तसेच दावा कलम १अ च्या पूर्व बाजूस प्रतिवादी क्र.२ यांच्या मालकीची मिळकत आहे व पश्चिम बाजूस प्रतिवादी क्र.१ यांची दावा कलम १ब मधील नमूद केलेली मिळकत आहे ही वस्तुस्थिती अभिलेखावर आणण्याकरिता न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक व्हावी

अशी विनंती केली आहे. वास्तविकपणे दावा मिळकतीची मालकी व ताबेकब्जा हा वादीने पुराव्यानिशी सिध्द करणे गरजेचे असते. त्याकरिता न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करणे उचित ठरणार नाही.

८. प्रतिवादीने याकरिता खालील न्यायनिर्णयांचा आधार घेतला आहे.

1. *नलूबाई नारायण शिंदे वि. गोपीनाथ दगडू शिंदे, २०११ (२) महा.लॉ.ज. ९९१*
2. *अर्जुन रामभाऊ धनकुडे वि. भानुदास रामचंद्र मुरकुटे व इतर, २०२० (२) महा.लॉ.ज. १४५*
3. *ज्ञानदेव विठ्ठल सालके वगैरे वि. दगडू कादर इनामदार, २०१७ (३) महा.लॉ.ज. ३१४*

प्रतिवादीने दाखल केलेल्या न्यायनिर्णयांचे मी काळजीपूर्वक अवलोकन केले. सदर न्यायनिर्णयामध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी असे निर्देशित केले आहे की, दावा मिळकतीचा ताबा शाबित करण्याकरिता न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करता येणार नाही.

1. *धोंडीराम निवृत्ती पवार – मयत तर्फे वारस धनाजी धोंडीराम पवार वि. लक्ष्मण खाशाबा पवार व इतर, २०१८ (२) महा.लॉ.ज. २५५*

प्रतिवादीने दाखल केलेल्या या न्यायनिर्णयाचे अवलोकन केले. सदर न्यायनिर्णयामध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी असे निर्देशित केले आहे की, न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक पुरावा गोळा करण्यासाठी करता येणार नाही.

९. वादीने असे कथन केले आहे की, दावा कलम १अ मधील मिळकतीच्या पश्चिम बाजूस बांध आहे व त्या बांधावर शेव–याची झाडे आहेत व ती झाडे वादीच्या मालकीची आहेत. सदरची झाडे वादीच्या मालकीची आहेत किंवा

कसे ही बाब अभिलेखावर आणण्याकरिता न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करावी अशी विनंती केली आहे. वास्तविकपणे दावा कलम १अ मधील मिळकतीच्या बाजूचा बांध व झाडे यांची मालकी वादीने पुराव्यानिशी सिध्द करणे गरजेचे आहे. त्याकरिता न्यायालयीन आयुक्त नेमणे गरजेचे नाही. दावा मिळकत १अ च्या ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता सदरची मिळकत ही वादी प्रतिवादी यांची सामाईक मिळकत असल्याचे दिसून येत आहे. सदर मिळकतीचे विभाजन झाल्याचे ७/१२ उता–यावरुन आढळून येत नाही. त्यामुळेन्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करुन दावा मिळकतीमध्ये केलेल्या डाळिंब पिकाची लागवड हे कोणाच्या मालकीची आहे हे अभिलेखावर येणे शक्य नाही. याकरिता वादीने स्वतंत्र पुरावा देणे गरजेचे आहे.

१०. वादी असे कथन करतो की, गट क्र.९४, मौजे सस्ते, ता. पंढरपूर या शेतजमीनीमध्ये वादीच्या मालकीच्या व ताबेकब्जेच्या क्षेत्रामध्ये असणा–या शेततळयामध्ये पाईपलाईन करुन सदरचे पाणी वादीच्या मिळकतीमध्ये आणण्याचा प्रयत्न केला आहे ही बाब अभिलेखावर आणण्याकरिता न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक होणे गरजेचे आहे. वास्तविकतः गट क्र.९४ च्या ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता, सदर मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र.१ यांची सामाईक मिळकत दिसते. वादीच्या कथनाप्रमाणे गट क्र.९४ मध्ये त्याच्या मालकीची शेततळे आहे व सदर शेततळयामधून इलेक्ट्रीक मोटारच्या साहाय्याने शेततळयाचे पाणी दावा कलम १अ मधील मिळकतीमध्ये वादी आणतो. सदरची बाब अभिलेखावर आणण्यासाठी वादी इलेक्ट्रीक मोटारचे वीजबिल तसेच शेततळयासंदर्भातील कागदपत्रे अभिलेखावर आणू शकतो. त्याकरिता न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करणे गरजेचे नाही.

११. प्रतिवादीने दाखल केलेल्या म्हणण्यामध्ये त्याने वादीचे म्हणणे नाकारले म्हणून वादीला न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करुन सदरची बाब अभिलेखावर आणण्याचा प्रयत्न करणे गरजेचे नाही. त्याकरिता वादीने स्वतंत्र पुरावा

देणे गरजेचे आहे. दावा मिळकतीची वस्तुस्थिती अभिलेखावर आणण्याची सर्वस्वी जबाबदारी वादीची असते. सदर प्रकरणामध्ये अद्याप नि.क्र.०५ निकाली करण्यात आलेले नाही व त्यापूर्वीच न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करणे उचित ठरणार नाही. सर्वप्रथम वादीने त्याच्या लाभात असणारी प्रथमदर्शनी केस सिध्द करणे गरजेचे आहे व योग्य वेळी गरज पडल्यास न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करणे उचित ठरणार आहे. आजच्या घडीला न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करणे गरजेचे नाही. सबब वादीचा अर्ज वरील कारणास्तव फेटाळणेस पात्र आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

Priyanka Namdev Pathade
Digitally signed by Priyanka Namdev Pathade
Date: 2023.09.12 17:46:36 +0530

दिनांक: १२.०९.२०२३ ( पी.एन. पठाड )

४थे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,

पंढरपूर.

**Certificate**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | S. S. Tupdauru |
| Court | - | 4th Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Pandharpur |
| Date of Judgment/Order | - | 12.09.2023 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 12.09.2023 |
| Judgment/Order uploaded on | - | 12.09.2023 |